MANGO RESEARCH SUB CENTRE
RAMESHWAR, Po. Vijaydurg,
Tal. Deogad, Dist. Sindhudurg
Mobile : 9370975818

www.dbskkv.org
mrscrameshwar@gmail.com

आंबा संशोधन उपकेंद्र
रामेश्वर, पो. विजयदुर्ग,
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग
भ्रमणध्वनी क्र. ९३७०९७५८१८

जा.क्र. आंसंऊकें/रामेश्वर/दरपत्रक/ 224 /२०२३, दिनांक 02/03/2023

...........................

...........................

...........................

**विषय :— आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वरच्या प्रक्षेत्रावर सुरक्षा रक्षक पुरविण्यासाठी दरपत्रक पाठविणेबाबत...**

महाशय,

आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर, पो. विजयदुर्ग, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग या कार्यालयाच्या प्रक्षेत्रावर आंब्याची व्यापारी तत्वावर लागवड केलेली आहे. तसेच ड्रगन फ्रुट फळपिकाची लागवड केलेली आहे. याशिवाय रोपवाटीका, भांडाराची इमारत व कार्यालयाची इमारत आहे. या सर्वमालमत्तेची दिवस व रात्र सुरक्षाकरणेसाठी ०३ (तिन) सुरक्षा रक्षकांची माहे एप्रिल २०२३ ते जुलै २०२३ असे चार महिन्याकरीता ठेकेदारी तत्वावर नेमण्याचे आहेत. तरी सदरचे सुरक्षा रक्षक आपण काय दराने पुरवू शकाल. याबाबतचे दरपत्रक या कार्यालयास दिनांक 16/03/2023 पर्यंत पोहोचेल अशा रितीने सिलबंद लखोटयात निम्नस्वाक्षरीकार यांच्या नावे पाठवावे.

सुरक्षा रक्षक पुरविण्याबाबतच्या अटी व शर्ती

१. प्रत्येक सुरक्षा रक्षकाने नेमून दिलेल्या कामाच्यावेळी वेळेत हजर असणे आवश्यक आहे.
२. प्रत्येक सुरक्षा रक्षकाच्या कामामध्ये त्यांच्या अधिपत्याखालील प्रक्षेत्रावर चोरी किंवा नुकसान झाल्यास त्या सुरक्षा रक्षकास जबाबदार धरण्यात येईल व त्याच्या देयकामधून किंवा सुरक्षा अनामत रक्कमेतून संबंधीत नुकसान भरपाई वसूल करण्यात येईल.
३. प्रक्षेत्रावर सुरक्षा रक्षकाकडून कामचूकारपणा आढळल्यास ठेकेदाराचा ठेका रद्द करण्यात येईल.
४. प्रक्षेत्रावर राखण करण्यासाठी लागणारी बॅटरी व सेल कंत्राटदाराने स्वतः पुरविणेचे आहेत.
५. सुरक्षा रक्षकाने वेतन अदायकीसाठी प्रत्येक महिन्यानंतर निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे देयक द्यावयाचे आहे.
६. सुरक्षा रक्षकाच्या कामाचा दर ०८ तासांकरीता प्रति दिन देण्यात येईल.
७. प्रत्येक सुरक्षा रक्षकाने कर्तव्य बजावण्यापूर्वी नोंदणी वहीत हजेरी लावावी व पूर्वी कर्तव्यावर असणाऱ्यासुरक्षा रक्षकाकडून प्रक्षेत्र, इमारतीची पहाणी करूनच ताब्यात घ्यावे.

Scanned with CamScanner

८. काही अपरिहार्य कारणामुळे कामावर हजर राहता येणार नसेल तर त्याबाबत आगावू सूचना देणे आवश्यक आहे. तसेच त्यासाठी पर्यायी व्यवस्था ठेकेदारांनी स्वत: करावयाची आहे.

९. आपणांस सुरक्षा रक्षकाचे कंत्राटी काम मिळाल्यास विद्यापीठाकडे कायमस्वरूपी नोकरी मिळणेबाबत आपणांस कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही.

आपला विश्वासू

उद्यानविद्यावेत्ता
आंबा संशोधन उपकेंद्र, रामेश्वर
ता. देवगड जि. सिंधुदुर्ग.

Scanned with CamScanner